Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०१७-१८

परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यात उच्च शिक्षणाची गंगा घराघरापर्यंत पोंहचविणारी एक आदर्श शिक्षण संस्था म्हणून हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाकडे पाहिले जाते. कै. राजाभाऊ कदम यांच्या दूरदर्शीत्वामुळे आज तालुक्यातील प्रत्येक गावागावात पदवीचे शिक्षण घेतलेले व घेणारे विद्यार्थी हेच आमच्या महाविद्यालयाचे खरे भूषण आहे. हा वसा आणि हा वारसा नेटाने पुढे नेणारे संस्थाध्यक्ष मा. परमेश्वर कदम साहे व प्राचार्य डॉ.वसंतराव सातपुते यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आज कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय सर्वतोपरी प्रयत्नरत आहे. विद्यार्थी केंद्रित अध्ययन-अध्यापनाची उज्ज्वल परंपरा आमचे महाविद्यालय चालवते आहे. आधुनिक सोयीसुविधांनी परिपूर्ण सुसज्ज इमारत, खेळासाठी भव्य क्रीडांगण, सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याची निगराणी, अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकवर्ग यासोबतच महिला सशक्तीकरण, रासेयो, सांस्कृतिक विभाग, करियर ॲण्ड कौन्सिलिंग सेल, क्रीडा विभाग आदि माध्यमातून वर्षभर हरतऱ्हेने विद्यार्थी केंद्रित अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविले जातात. ते खालीलप्रमाणे संक्षिप्त रुपात देत आहोत.

**राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.):-**

1. कोल्हापूर येथे झालेल्या आव्हान - 2017 मध्ये महाविद्यालयाच्या कु.सुनिता भोसले, कु. श्रद्धा भोसले, आसेफ अत्तार व गणेश बागल यांचा सहभाग.
2. रा.से.यो.च्या वतीने महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण व योग शिबीराचे आयोजन.
3. पल्स पोलिओ लसीकरण या राष्ट्रीय उपक्रमात विद्यार्थ्यांचा स्वयंसेवक म्हणून सहभाग.
4. पालम येथील माधवराव पाटील महाविद्यालयात आयोजित युवती शिबीरात कु.निता भोसले, कु. कन्याकुमारी भोसले, कु. सिद्धी गंगणे, कु. रोहिणी निरपणे, कु.मुळे यांनी सहभाग नोंदविला.
5. परभणी व हिंगोली जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्त्व शिबीरात चंदू वाणी, सचिन बोडके व मसूरे यांनी सहभाग नोंदविला.
6. या वर्षीचे विशेष शिबीर मौ. विटा खुर्द ता. सोनपेठ येथे दि. 29 जाने. ते 04 फेब्रु. 2018 दरम्यान पार पडले.

रा.से.यो. विभागाची संपूर्ण धुरा कार्यक्रमाधिकारी म्हणून प्रा. डॉ.मारोती कच्छवे, प्रा.डॉ. शिवाजी अंभुरे व प्रा. डॉ. मुक्ता सोमवंशी यांनी वाहिली.

**सांस्कृतिक विभाग :-**

1. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागताचा (wel-come) कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी पो.स्टे.सोनपेठचे ए.पी.आय. बाबुराव जाधव व प्राचार्य सातपुते यांनी मार्गदर्शन केले.
2. ऑगस्ट महिन्यात गुणानुक्रमे विद्यार्थी संसदेची स्थापना करण्यात आली. यात कु. मुंढे सोनाली उत्तम (B.com.S.Y.) यांची विद्यार्थी संसद सचिव म्हणून निवड व शिंदे सूर्यकांत गंगाधर यांची सांस्कृतिक प्रतिनिधी म्हणून सर्वानुमते निवड झाली.
3. शिक्षक दिनाचे औचित्य साधून 5 सप्टें. रोजी 'रोटरी क्लब सोनपेठ' व सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाविद्यालयात गुरुगौरव पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यात श्री. शोकत पठाण, प्रा.डॉ. संतोष रणखांब, प्रा. गोविंद लहाने, श्री शेख सिकंदर, श्री. ओमप्रकाश लष्करे व सौ. कन्याकुमारी आरावत यांना सन्मानपूर्वक पुरस्कार प्रदान केले.
4. 02 ऑक्टो. 2017 रोजी म.गांधी यांचा जन्मदिवस व लालबहादूर शास्त्री यांची जंयती साजरी केली.
5. 16 ऑक्टो. रोजी वाचन प्रेरणा दिन व डॉ.ए.पी.जे. अब्दूल कलाम यांच्या जीवनचरित्रावर निबंधस्पर्धा घेण्यात आली.
6. 23 सप्टें. ते 26 सप्टें. 2017 दरम्यान स्वा.रा.ती.म.विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन युवकमहोत्सव 'वसुंधरा - 2017' मध्ये महाविद्यालयाच्या 16 विद्यार्थ्यांनी 11 कलाप्रकारात सहभाग नोंदवला. संघव्यवस्थापक म्हणून प्रा.सखाराम कदम व प्रा. बी.व्ही.आंधळे यांनी जबाबदारी घेतली.

Scanned with OKEN Scanner

7. पं.स.सोनपेठ व महाविद्यालयाच्या वतीने तालुकास्तरीय स्वच्छता मित्र वक्तृत्व करंडक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.
8. 27 व 28 फेब्रु. 2018 दरम्यान महाविद्यालयाचे वार्षिक स्नेह संमेलन 'वसंतोत्सव-2018' संपन्न झाले. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ.संतोष नायबळ व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. किशोर विश्वामित्रे (सुप्रसिद्ध नाट्यकलावंत) यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. सखाराम कदम, डॉ.बी.व्ही. आंधळे व डॉ. वनिता कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात व प्राचार्यांच्या सहकार्याने हा विभाग कार्यरत आहे.

**क्रीडा विभाग :-**

1. स्वा.रा.ती.म.वि.नांदेड अंतर्गत 'ड' झोन तायक्वांदो स्पर्धेचे आयोजन 10 सप्टें. 2017 रोजी महाविद्यालयात करण्यात आले. यात 56 किलो वजनी गटात ऋषीकेश फपाळ याचा प्रथम क्रमांक आला.
2. क्रीडा विभागाकडून 21 जून 2017 रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी योगशिबीर व प्राणायाम प्रात्यक्षिके प्रा. विठ्ठल जायभाये यांच्या मार्गदर्शनात पार पडली.
3. 29 ऑगस्ट 2017 रोजी 'क्रीडा दिन' साजरा करण्यात आला.
4. अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड येथे झालेल्या जलतरण (Swimming) स्पर्धेत महाविद्यालयाच्या गणेश बागल (B.Com.S.Y.) या विद्यार्थ्याने सहभाग नोंदवला.
5. नागनाथ महाविद्यालय, औंढा नागनाथ येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेतून महाविद्यालयाचा विद्यार्थी कृष्णा बर्वे याची गुणानुक्रमे विद्यापीठ स्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली.
6. के.के.एम. महाविद्यालय, मानवत येथे झालेल्या लांब उडी स्पर्धेत शाबाज सय्यद (B.Sc.) या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक मिळविला.
7. विद्यार्थ्यांमध्ये फुटबॉल खेळाविषयी आवड निर्माण व्हावी म्हणून 'मिलियन फुटबॉल मिशन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
8. जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा व खो-खो स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

क्रीडा विभागाची ही दमदार कामगिरी क्रीडा संचालक प्रा. गोविंद वाकणकर यांच्या मार्गदर्शनात झाली.

COC (Carrier & Counsiling cell):-

1. महाविद्यालयात COC चे उद्घाटन 26 जून रोजी झाले.
2. दि. 8 सप्टें. 2017 रोजी COC च्या वतीने 'स्पर्धा परीक्षा आणि मराठी व्याकरण' या विषयावर प्रा.सखाराम कदम यांनी महाविद्यालयात व्याख्यान दिले.
3. डॉ.बालाजी रोकडे यांचे 'विदेशातील संधी आणि आव्हाने' या विषयावर व्याख्यान COC च्या वतीने संपन्न झाले.
4. पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा येथे आयोजित स्पर्धा परीक्षेसाठी महाविद्यालयाच्या 6 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
5. शिवजयंतीनिमित्त महाविद्यालयात दि. 23 फेब्रु. 2018 रोजी तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले गेले.
6. COC च्या वतीने दि. 10 मार्च रोजी पूर्वतयारी परीक्षेचे आयोजन करण्यात आले.

COC विभागाची संपूर्ण जबादारी प्रमुख डॉ.गोलेकर के.एम. यांनी सदस्य डॉ. बर्वे ए.पी. , डॉ. शिंदे बी.आर. डॉ.रणखांब एस.व्ही. यांच्या सहकार्याने पूर्ण केली

**ग्रंथालय विभाग :-**

1. सन 2017-18 मध्ये 234 पुस्तके व 114 नव्या संदर्भग्रंथांची खरेदी केली गेली. ज्यांची खरेदी किंमत रु. 97405/- इतकी आहे.
2. 133 पुस्तके देणगी स्वरुपात ग्रंथालयास प्राप्त झाली. ज्याची खरेदी किंमत रु. 33,000/- इतकी आहे. ई-बुक्स ग्रंथालयात उपलब्ध आहेत.
3. ग्रंथालयाकडून ग्रंथ साक्षरता, माहिती सेवा, ओपॅक, कात्रण सेवा उपलब्ध करुन दिली आहे.
4. ग्रंथालयामार्फत वाचकसंख्या वाढावी म्हणून दरवर्षी उत्कृष्ट वाचक पुरस्कार दिला जातो. सन 2017-18 मध्ये बी.एस्सी. तृतीय वर्षातील महेश निरपणे यांना हा पुरस्कार प्रदान केला गेला.
5. ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ.एस.आर. रंगनाथन यांची जयंती (12 ऑगस्ट) ग्रंथदान करुन साजरी करण्यात आली.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Tq.Sonpeth Dist.Parbhani



Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



6. प्रा.डॉ.अनंत सरकाळे यांनी चालू शै.वर्षात PGD-LAN हा पददव्यूत्तर कोर्स हैद्राबाद विद्यापीठातून विशेष प्राविण्यासह पूर्ण केला.

ग्रंथालयातील उपलब्ध संसाधनांचा सुयोग्य वापर करण्यासाठी नेहमी ग्रंथपाल प्रा.डॉ. अनंत सरकाळे व परिचर संतुक परळकर यांचे सहकार्य लाभते.

**महिला सक्षमीकरण, लैंगिक अत्याचार प्रतिबंध व महिला तक्रार निवारण कक्ष :-**

1. 10 ऑगस्ट रोजी सर्व विद्यार्थिनींना महिला तक्रार निवारण कक्ष सुरक्षेविषयीची संपूर्ण माहिती व मार्गदर्शन डॉ.सुनिता टेंगसे, डॉ.मुक्ता सोमवंशी, वनिता कुलकर्णी व प्राचार्य शेख शकिला यांनी दिली.
2. दि. 3 जाने. रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीचे औचित्य साधून महिला सक्षमीकरण सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी मा. परमेश्वर कदम साहेब व प्राचार्य डॉ.वसंत सातपुते यांची उपस्थिती होती.
3. दि. 4 जाने. 2018 रोजी 'महिला सुरक्षा' या विषयावर पो.नि. सोपान सिरसाट यांनी मार्गदर्शन केले. यावेळी 'महिलांचा बदलता दर्जा व भारतीय समाज व्यवस्था' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली.
4. विशाखा समिती व महिला सक्षमीकरण समितीच्या सर्व सदस्यांनी दि. 6 जाने. रोजी मुलींसाठी मैदानी स्पर्धा घेतल्या.
5. दि. 8 जाने. रोजी 'सक्षम महिला' या विषयावर पोस्टर स्पर्धा घेण्यात आली.
6. दि. 9 जाने. रोजी 'काव्यवाचन' स्पर्धा घेण्यात आली.
7. दि. 12 जाने. रोजी माँ जिजाऊ जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या मैदानावर सामूहिक जिजाऊ वंदना घेण्यात आली. त्यानंतर गीतगायन स्पर्धा घेण्यात आली. या विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना वार्षिक 'स्नेह संमेलन वसंतोत्सव-2018' वेळी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरित करण्यात आले.

महिलांविषयीच्या या कक्षाची संपूर्ण जबाबदारी डॉ. सुनिता टेंगसे, डॉ.मुक्ता सोमवंशी, डॉ.वनिता कुलकर्णी, प्रा. शकिला शेख यांच्याकडून पूर्ण झाली.

**बहिःशाल शिक्षण केंद्र :-**

स्वा.रा.ती.म.वि.नांदेड यांच्याकडून चालू वर्षी महाविद्यालयातील डॉ.एम.डी. कच्छवे, डॉ.बी.व्ही.आंधळे व डॉ.एस.व्ही.रणखांब यांना बहिःशाल व्याख्याते म्हणून मान्यता दिली आहे. या तिन्ही व्याख्यात्यांनी विविध बहिःशाल केंद्राकडून आयोजित व्याख्याने दिली.

**विद्यार्थी कल्याण निधी :-**

महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या दूर्बल असलेल्या विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य करण्याच्या उद्देशाने हा निधी कार्यरत कर्मचाऱ्यांकडून उभारला जातो. शै.वर्ष 2017-18 मध्येही या कक्षाकडून 27 विद्यार्थ्यांना प्रवेश फीस, परीक्षा फीस, बस पास, पुस्तके आदि स्वरुपात हा निधी वापरला जातो. या विभागाची जबाबदारी डॉ.काळे बी.एम. व आंधळे बी.व्ही. यांच्याकडे आहे.

**संशोधन समिती :-**

1. महाविद्यालयातील प्रा. अशोक जाधव यांनी लोकप्रशासन विषयात पीएच.डी. ही पदवी संपादन केली.
2. प्रा.डॉ.मुक्ता सोमवंशी यांनी लिहिलेल्या 'पंचायत राज संस्थेतील महिला प्रतिनिधी व निर्णय प्रक्रिया' व 'कार्यालय प्रशासन' या दोन मौलिक पुस्तकाचे प्रकाशन यावर्षी झाले.
3. प्रा. विकास रागोले यांचे 'A Text book of physical chemistry' व प्रा.संदीप देवराय यांचे 'A Text book of Organic chemistry' ही पुस्तके प्रकाशित झाली.
4. स्वा.रा.ती.म.विद्यापीठाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय अविष्कार महोत्सवात महाविद्यालयाच्या कु.श्रद्धा भोसले व कु. सिद्धी गंगणे यांनी सादर केलेल्या Bio Control of household insect pest (Mosquito & housefly) या शोध प्रकल्पाचा दुसरा क्रमांक आला.
5. डॉ.एम.बी.पाटील यांच्याकडून लघुशोध प्रकल्पाच्या अंतिम अहवालाचे यु.जी.सी. WRO पुणे यांच्याकडे सादरीकरण.

संशोधन समितीचा कार्यभार डॉ.सा.द.सोनसळे पाहतात.

**सहल विभाग :-**

1. डॉ.सुनिता टेंगसे व प्रा.विठ्ठल जायभाये यांच्या नेतृत्त्वात महाविद्यालयाच्या इंग्रजी व समाजशास्त्र विभागाच्या वतीने 25 जाने. 2018 रोजी संयुक्त सहलीचे आयोजन कुष्ठरोग पुनर्वसन केंद्र नेरली जि. नांदेड येथे करण्यात आले होते. स्वा.रा.ती.म.वि.नांदेड



Scanned with OKEN Scanner

Late Nitesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

येथील भाषा संकुल व मा. कुलगुरुंची भेटही त्यांनी घेतली.

2. लोकप्रशासन विभागाच्या वतीने श्रीपतरायवाडी ता. अंबाजोगाई येथे सहल काढण्यात आली. तेथील जलसंवर्धन व ग्रामविकास याविषयी सविस्तर माहिती त्यांनी मिळविली. डॉ.मुक्ता सोमवंशी यांचे साहाय्य लाभले.
3. इतिहास विभागाच्या वतीने मुद्गल ता. पाथरी येथील मुद्गलेश्वर या हेमाडपंथी प्राचीन मंदिरास भेट देऊन हेमाडपंथी स्थापत्य कला व बांधकामाविषयी अवगत करण्यात आले. डॉ.अंभुरे एस.डी. व मिसाळ एम.के. यांचे मार्गदर्शन लाभले.
4. प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगांव व कै.सुंदरराव सोंळके महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागास भेट दिली. तसेच सिंदफणा नदीवरील जायकवाडी धरण - 2, छोटीवाडी येथील म्हैसपालन प्रकल्प , देवकृपा गोशाळा पवारवाडी तसेच पारंपारिक मेंढीपालन आदी प्रकल्पाची पाहणी सर्व विद्यार्थ्यांनी केली. या सहलीच्या यशस्वीतेसाठी प्रा.संतोष रणखांब व प्रा. विठ्ठल मुलगीर यांनी सहकार्य केले.
5. वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने डॉ.एम.बी.पाटील यांच्या सहकार्याने वसंतराव नाईक मराठवनाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ऊती संवर्धन केंद्रास भेट देण्यात आली. तसेच शिवाजी महाविद्यालय, परभणीच्या वनस्पतीशास्त्र विभागास भेट देऊन त्याठिकाणी चालणाऱ्या संशोधन कार्याची माहिती घेतली.
6. वाणिज्य विभागाच्या वतीने इचलकरंजी येथील कापडमीलला औद्योगिक सहलीच्या निमित्ताने भेट दिली. यावेळी विविध उद्योजकांनी कापडनिर्मितीविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

सहल विभागाचे आयोजन व नियोजन प्राचार्य डॉ.वसंत सातपुते व प्रा.डॉ.अशोक चव्हाण यांच्या मार्गदर्शनात केले जाते.

**वाणिज्य विद्याशाखेचा संक्षिप्त अहवाल:-**

1. वाणिज्य विषयाचे प्रा.डॉ.अशोक चव्हाण यांची स्वा.रा.ती.म.वि.नांदेडच्या वाणिज्य अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून कुलगुरूमार्फत निवड.
2. वर्षाच्या सुरुवातीस 'वाणिज्य अभ्यास मंडळाचे उद्घाटन' व 'वाणिज्य वार्ता' भीत्तीपत्रकाचे अनावरण प्राचार्य डॉ.वसंत सातपुते यांच्या हस्ते झाले.
3. GST वर विशेष कार्यशाळेचे आयोजन व भीत्तीपत्रकाचे प्रकाशन.
4. डॉ.एम.डी.कच्छवे व प्रा. संतोष वडकर यांच्या मार्गदर्शनात इचलकरंजी येथील कापड उद्योगास 19 विद्यार्थ्यांसह औद्योगिक सहल काढून भेट देण्यात आली.
5. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी रुपेश देशमुख वाणिज्य विषयात सेट (SET) परीक्षा उत्तीर्ण झाले.
6. डॉ.मारोती कच्छवे यांची स्वा.रा.ती.म.विद्यापीठच्या 'Company law' अभ्यासमंडळावर निवड.

वाणिज्य विभागात प्रा.डॉ.एम.डी.कच्छवे, डॉ.ए.डी.चव्हाण, डॉ.बी.आर.शिंदे व प्रा.सुरेश काळे (CHB) कार्यरत आहेत.

**कलाशाखेतील विविध विषयांचा संक्षिप्त अहवाल :-**

सर्व प्राध्यापकांचे विविध चर्चासत्रे, परिषदेतील शोधनिबंध वाचन व प्रकाशन वर्षभर होत असते.

**मराठी विभाग :-**

दरवर्षी मराठी विभागाकडून दि. 1 जाने. ते 15 जानेवारी दरम्यान मराठी भाषासंवर्धन पंधरवडाचे आयोजन केले जाते. या दरम्यान -

1. दि. 3 जाने. रोजी साहित्यिक सावित्रीबाई फुले भीत्तीपत्रकाचे प्राचार्यांचे हस्ते प्रकाशन.
2. दि. 10 जाने. रोजी प्रा. हनुमान व्हरगुळे यांच्या 'मराठीभाषा संवर्धन काळाची गरज' या विषयावर व्याख्यान झाले.
3. कवी राजेश रेवले व प्रा.हनुमान व्हरगुळे यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम संपन्न झाला.
4. कवी श्रीकांत देशमुख यांना साहित्य अकादमी पुरस्कार लाभल्याचे औचित्य साधून 'गौरव बळिवंताचा' या भीत्तीपत्रकाचे बी.ए.प्रथम वर्षातील शीतल सोळंके, अमृता कदम, मयुरी उबाळे यांच्याकडून प्रकाशन.
5. लेखक अरुण साधू यांच्या निधनानंतर 'साहित्य सिंहासन हरवले' या भीत्तीपत्रकाचे अनावरण महाविद्यालयात करण्यात आले.

- दि. 27 फेब्रूवारी रोजी जागतिक मराठी दिनाचे औचित्य साधून डॉ.बा.मु.काळे व



Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

डॉ.सा.द. सोनसळे यांनी बसस्थानक व एल.आर.के. स्कूल मध्ये व्याख्याने दिली.

- प्रा.सखाराम कदम यांचा 'म्या तुकारामाची माय बोलते' हा लेख दै.देशोन्नतीमधून दि. 07 ऑगस्ट 2017 रोजी प्रकाशित.
- सहयोगी प्राध्यापक डॉ.सा.द. सोनसळे यांना मसाप शाखा अंबाजोगाई साहित्य सम्मेलनात डॉ.संतोष मुळावकर शिक्षक-लेखक पुरस्कार प्राप्त झाला. (सन 2017-18)
- स्वा.रा.ती.म.वि.नांदेडच्या मराठी अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून विभागातील डॉ.सा.द.सोनसळे यांची कुलगुरूमार्फत निवड झाली.
- लेखक, संशोधक डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या निधनानंतर प्रथम वर्षातील विद्यार्थी तुकाराम पांचाळ यांनी बनविलेल्या विद्रोहाचे वादळ निमाले या भीत्तीपत्रकाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते, मराठी विभाग प्रमुख डॉ.बा.मु.काळे व प्रा.डॉ. सा.द.सोनसळे यांच्या हस्ते प्रकाशन.
- विद्यार्थ्यांकडून सेमिनार व प्रकल्प लेखन पूर्ण केले.

मराठी विभागातील ही सर्व कामगिरी प्रा.डॉ.बालासाहेब काळे (विभागप्रमुख) प्रा.डॉ.सा.द.सोनसळे व प्रा.सखाराम कदम यांच्या सहकार्याने पूर्ण केली.

## हिन्दी विभागः-

1. 09 सप्टे. 2017 रोजी हिन्दी अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन करण्यात आले.
2. 14 सप्टे. 2017 रोजी 'हिन्दी दिवस समारोह' व 'राष्ट्रवाणी' भीत्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले.
3. 3 ऑक्टो. रोजी सूर्यकांत त्रिपाठी निराला जन्मदिवस समारंभ साजरा.
4. 10 जाने. रोजी विश्व हिन्दी दिनानिमित्त 'गजल' भीत्तीपत्रकाचे अनावरण.
5. विविध ठिकाणी व्याख्याने व परीक्षक म्हणून सहभाग.
6. विभागातील डॉ.शिवाजी वडचकर यांना या शैक्षणिक वर्षात 'युनिव्हर्सल रिसर्च ग्राउंड मासिकाचा राष्ट्रीय सन्मान पुरस्कार-2017' प्राप्त झाला.
7. डॉ.एस.ए.वडचकर यांना 'सूर्यकांत त्रिपाठी निराला' राष्ट्रीय सन्मान पुरस्कार 2018 ने सन्मानित करण्यात आले.
8. डॉ.वनिता कुलकर्णी यांनी 19 जुलै ते 24 जुलै 2017 दरम्यान हैद्राबाद युनिव्हर्सिटीतून Short Term Course पूर्ण केला.

## इंग्रजी विभाग :-

**Faculties:** Principal & Head Dr. Satpute V.D., Assistant Prof. Jaybhaye V.K.

**Highlights**

- Active 'The English Club'.
- Published Wall Posters on various occasions.
- Celebrated Sant Sevalal Mahraj Jayanti.
- Use of Power Point Presentation.
- Videos, presentations and actively use of ICT in teaching-learning.
- **Educational Tour**- visited Nerli Leprosy Centre Nanded, Interview with Hon. VC Dr Pandit Vidyasagar Sir, Department of English and Social Sciences of SRTMU Nanded and Huzur Sahib Nanded Gurudwara.
- Two MRP sanctioned for both the faculties.

**Research, Co-curricular and Extension activities by the Faculties of the Department**

**Principal Dr. V. D. Satpute**
(Head, Department of English)

01. As a chief guest, addressed students of the SPP College, Sirsala Dist. Beed on the occasion of 'The Alumni Meet' on 23.08.02017
02. Continued membership for Rotary Club Sonpeth and organized following programmes:
    - ➢ Organized charity show of magician N.C. Sarkar's 'MAYAJAL'.
    - ➢ Provided sitting desks to the public places like: Bus Stand, Police Station, Tahsil Office, Registry Office and Van Maroti, Dudhgaon.
    - ➢ Constructed Water Tank for 'Drinking Water' purpose at Sonpeth bus stand.
03. Organized Workshop on GST in July 2017.
04. As a research person addressed to participant delegates in one day National Seminar on 'Politics, Literature and Media in India' on 25.02.2018.
05. Evaluated Ph.D. thesis of Mr. Tupare B.A. from Dr. BAMU Aurangabad (Nov.2017).
06. Paid Rs. 1000/ for the student help fund of the college and donated books to library as the part of the Best Practice.
07. Nominated as Non-government member on Taluka Level Anti Corruption Committee for Sonpeth.
08. As a resource person addressed to the participants in the Multi-lingual National

Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

Seminar on 'The Role of Performing Arts in Personality Development' organized by SPP College, Sirsala on 24.02.2018.

09. Awarded two Ph.D. scholars under my supervision of Mr. Pawar M.N. and Bidve M.R.

10. Following events organized at college as a chief organizer/ participant:

- ICSSR Sponsored One Day National Level Seminar on 'Woman Safety: Problems and Challenges' on 22.07.0217
- One Day Regional Level workshop on GST on 03.09.2017
- One Day State Level Workshop on 'Research Project Writing and Recent Amendments in API Under CAS' on 29.09.2017
- CBCS Workshop.

**Asst. Prof. Jaybhaye V.K.**

01. Continued membership for Rotary Club Sonpeth and organized following programmes:

- Organized charity show of magician N.C. Sarkar's 'MAYAJAL'.
- Provided sitting desks to the public places like: Bus Stand, Police Station, Tahsil Office, Registry Office and Van Maroti, Dudhgaon.
- Constructed Water Tank for 'Drinking Water' purpose at Sonpeth bus stand.
- Donated Blood in Blood Donation Camp by Police Station, Sonpeth.
- Participated in Polio Eradication programme with Rotary Club, Sonpeth.
- Convener of the Workshop on GST in collaboration with Rotary Club Sonpeth 03.09.2017

**समाजशास्त्र विभाग :-**

1. विभागातील डॉ.सुनिता टेंगसे यांनी 17 ते 19 मे 2017 दरम्यान 'Social Action Trust' आणि 'थायलंड विद्यापीठाच्या' संयुक्त विद्यमाने झालेल्या कॉन्फरन्समध्ये ग्रामीण महिला सक्षमीकरणात बचत गटाची भूमिका या पेपरचे वाचन. यु.जी.सी.कडून Travel grant ला मान्यता.
2. महिला सुरक्षा : आव्हाने व उपाय या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय सेमिनारचे 22 जुलै रोजी आयोजन.
3. 26 जाने. 2018 रोजी सक्षम महिला भीत्तीपत्रक प्रदर्शनीचे आयोजन.
4. 25 जाने. रोजी विभागाची शैक्षणिक सहल नेरली कुष्ठधाम जि.नांदेड येथे नेण्यात आली.
5. तेजस्विनी बचत गट व महिलाद्वारे चालवले जाणारे उद्योगाविषयी माहिती मिळवण्यासाठी 40 विद्यार्थ्यांसह भेट दिली.
6. पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालयात 'कौटुंबिक हिंसाचार' विषयावर साधन व्यक्ती म्हणून डॉ.टेंगसे एस.ए. यांनी सहभाग घेतला.
7. 3 जाने. 2018 रोजी 'ज्योतिसावित्री' भीत्तीपत्रकाचे प्रकाशन.
8. 12 जाने. रोजी 'गाऊ जिजाऊस आम्ही' भीत्तीपत्रकाचे अनावरण.

समाजशास्त्र विभागात डॉ.सुनिता टेंगसे व प्रा.पंडित जोंधळे हे कार्यरत आहेत.

**अर्थशास्त्र विभाग :-**

1. अर्थशास्त्र विभागातील प्रा. अंगद फाजगे यांनी विविध ठिकाणी शोधनिबंधाचे वाचन केले.
2. प्रा.डॉ.ए.पी.बर्वे यांनीही विविध ठिकाणी शोधनिबंधाचे वाचन केले.

**लोकप्रशासन विभाग :-**

1. लोकप्रशासन विभागाच्या वतीने दि. 22 जुलै 2017 रोजी ICSSR पुरस्कृत 'महिला सुरक्षा : आव्हाने व उपाय' या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले गेले. यासाठी उद्‌घाटक म्हणून मा.चित्राताई वाघ (मा.सदस्य, राज्य महिला आयोग) यांची उपस्थिती.
2. 26 नोव्हे.2017 रोजी विभागाच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला व भीत्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.
3. 03 जाने. 2018 रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती व डॉ.मुक्ता सोमवंशी यांच्या 'कार्यालय प्रशासन' पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.
4. 24 जाने. 2018 श्रीपतरायवाडी येथील जलयुक्त शिवारास सहल काढून विद्यार्थ्यांसह भेट देण्यात आली.
5. 26 जाने. प्रजासत्ताक दिनाच्या वेळी 'रौप्य महोत्सव', '73 वी व 74 वी घटना दुरुस्ती' या भीत्तीपत्रकाचे प्रकाशन मा.परमेश्वर कदम यांच्या हस्ते संपन्न.
6. 6 मार्च रोजी ऐश्वर्या महा-ई-सेवा केंद्रास विद्यार्थ्यांसह भेट दिली.
7. डॉ.सोमवंशी एम.जी. यांनी वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर येथे राष्ट्रीय परिषदेत साधन व्यक्ती म्हणून शोधनिबंध सादर केला.



Scanned with OKEN Scanner

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



8. लोकप्रशासन विभागातील डॉ.अशोक जाधव यांना स्वा.रा.ती.म.विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली.
9. डॉ.अशोक जाधव यांना महात्मा फुले शिक्षण परिषदेचा 'म. जोतिराव फुले राज्यस्तरीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला.
10. डॉ.मुक्ता सोमवंशी यांच्या पंचायतराज संस्थेतील महिला प्रतिनिधी व निर्णयपक्रियेतील सहभाग या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.
11. डॉ.अशोक जाधव यांची स्वा.रा.ती.म.वि.नांदेडच्या लोकप्रशासन अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून कुलगुरूमार्फत निवड.

**राज्यशास्त्र विभाग :-**

1. विभागातील डॉ.के.एम. गोलेकर व डॉ.बी.व्ही. आंधळे यांनी विविध चर्चासत्रे, परिषदेतून शोधनिबंधाचे वाचन केले.
2. डॉ.बी.व्ही. आंधळे यांची स्वा.रा.ती.म.वि.नांदेड ने बहिःशाल व्याख्याते म्हणून निवड केली.
3. डॉ.बी.व्ही. आंधळे यांनी हिवाळी - 2017 परीक्षेअंतर्गत दक्षता पथकात सहभाग घेतला.
4. दि. 18,19,20 व 21 जून 2017 या चार दिवसात परभणी आकाशवाणी केंद्रावरुन निसर्गायन कार्यक्रमातून डॉ.बी.व्ही.आंधळे यांनी व्याख्यान दिले.
5. नवगण महाविद्यालय, परळी वैद्यनाथ येथे राज्यस्तरीय राज्यशास्त्र परिषदेत भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने या विषयावर डॉ.बी.व्ही.आंधळे यांनी 10 मार्च रोजी व्याख्यान दिले.
6. विभागाच्या वतीने भीत्तीपत्रकाचे प्रकाशन –
   - राष्ट्रपती रामनाथ कोविद यांच्या जीवन व कार्यकर्तृत्त्वावर
   - 26 जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालय या शीर्षकाचे भीत्तीपत्रक प्रकाशित.
7. 26 नोव्हेंबर रोजी संविधान दिनाचे आयोजन व उद्देशपत्रिकेचे सामूहिकवाचन करण्यात आले.
8. मतदान दिन, गटचर्चा व विद्यार्थी सेमिनारचे आयोजन केले.

राज्यशास्त्र विभागात डॉ.के.एम.गोलेकर व डॉ.बी.व्ही.आंधळे हे कार्यरत आहेत.

**इतिहास विभाग :-**

1. 26 जून रोजी इतिहास विभागाकडून छत्रपती शाहू महाराज जयंतीचे आयोजन करण्यात आले.
2. 23 फेब्रू. रोजी शिवजयंतीनिमित्त भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले.
3. शिवजन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमात सहभाग घेतला.
4. 04 फ्रेब्रू.रोजी मुद्‌गल येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले.

इतिहास विभागात डॉ.मोहन मिराळ व डॉ. अंभुरे एस.डी. कार्यरत आहेत.

**विज्ञानशाखेचा संक्षिप्त अहवाल :-**

कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयात बी.एस्सी. विद्याशाखा अनुदानित असून रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र व प्राणीशास्त्र हे विषय शिकविले जातात. या विषयासाठी डॉ. मुकुंदराज पाटील (Botony) , डॉ.संतोष रणखांब (Zoology), प्रा. संदीपकुमार देवराये व प्रा. विकास रागोले (Chemistry), प्रा.विठ्ठल मुलगीर (Zoology) प्रा. दहिफळे (Botany) हे कार्यरत आहेत. या तिन्ही विषयांचा संक्षिप्त अहवाल विषयनिहाय पुढीलप्रमाणे देत आहोत.

**वनस्पतीशास्त्र विभाग (Botany) :-**

1. 1 जुलै रोजी वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण.
2. 25 ऑगस्ट रोजी बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसह वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या 'ऊती संवर्धन केंद्रा'स शैक्षणिक सहल काढून भेट दिली.
3. 14 फेब्रू. रोजी 'औषधी वनस्पतीचे प्रदर्शन' भरवून तालुक्यातील सर्व शाळा व समाजाला विविध वनस्पतींचे औषधी गुणधर्म सांगितले.
4. विभागातील विद्यार्थ्यांसाठी वेळोवेळी शैक्षणिक चित्रफिती, व्हिडिओ, घटकचाचणी, गृहपाठ तसेच चर्चासत्राद्वारे मार्गदर्शन.
5. विभागप्रमुख डॉ.एम.बी.पाटील यांना स्वा.रा.ती.म.वि.नांदेडने नुकतीच संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे. दोन विद्यार्थी पीएच.डी. करत आहेत.
6. डॉ.एम.बी.पाटील यांनी WRO पुणे यांच्याकडे लघुशोध प्रबंधाचा अहवाल सुपूर्द केला.
7. महाविद्यालयांतर्गत कार्यशाळेत साधनव्यक्ती म्हणून सहभाग व IQAC समन्वयक म्हणून

कार्यभार डॉ.एम.बी.पाटील यांच्याकडे सोपवला.

वनस्पतीशास्त्र विभागात डॉ.एम.बी.पाटील व प्रा. दहिफळे कार्यरत आहेत.

**रसायनशास्त्र विभाग (Chemistry):-**

1. रसायनशास्त्राचे जनक Antonio Levoisier यांचा 26 ऑगस्ट या जन्मदिवसाचे बी.एस्सी. तृतीयवर्षाच्या विद्यार्थ्यांकडून भीत्तीपत्रकाचे प्रदर्शन भरवण्यात आले.
2. विभागातील विद्यार्थ्यांसाठी PPT मार्गदर्शन, शैक्षणिक चित्रफिती, व्हिडिओ, चाचणी परीक्षा, गृहपाठ व विद्यार्थ्यांसाठी सेमिनारचे आयोजन केले जाते.
3. विभागप्रमुख प्रा.एस.एम.देवराये व प्रा.व्ही.डी. रागोले यांचे लोणावळा येथील महाविद्यालयात शोधनिबंधाचे वाचन व प्रकाशन.

रसायनशास्त्र विभागात प्रा.एस.एम. देवराये व प्रा.व्ही.डी. रागोले कार्यरत आहेत.

**प्राणीशास्त्र विभाग (Zoology) :-**

1. महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागातील गुणवंत विद्यार्थिनींना संस्थाध्यक्ष मा.परमेश्वर कदम यांच्या हस्ते बक्षिसाचे वाटप.
2. विज्ञानशाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'हिमॅटॉलॉजी व युरिनॉलॉजीचे महत्त्व' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन व साधनव्यक्ती डॉ. प्रशांत चव्हाण.
3. 19 ऑगस्ट 2017 रोजी 'डासांची उत्पत्ती व हिवताप निर्मूलनावर' आधारीत कार्यशाळा संपन्न.
4. 17 सप्टें. 2017 रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून भव्य भीत्तीपत्रकाचे प्रदर्शन भरवण्यात आले.
5. एक दिवशीय शैक्षणिक सहल काढून म्हैसपालन प्रकल्पास भेट दिली.
6. माजलगाव येथील कै. सुंदरराव सोळंके महाविद्यालय व सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागास भेट देऊन माहिती दिली.
7. प्राण्यांविषयी अधिक माहिती मिळविण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी स्थानिक प्रकल्पांच्या भेटी घेतल्या व त्या त्या व्यक्तींकडून अनुभव शेअर केले.
8. विभागातील विद्यार्थ्यांना निबंधलेखन, वक्तृत्व, वाद-विवाद, गटचर्चा, पी.पी.टी.द्वारे अध्यापन तसेच शैक्षणिक चित्रफिती व व्हिडिओचे सादरीकरण नेहमी केले जाते.

प्राणीशास्त्र विभागात डॉ.संतोष रणखांब, प्रा. विठ्ठल मुलगीर व प्रा. जगदीश भोसले कार्यरत आहेत.

शैक्षणिक वर्ष 2017-18 चा महाविद्यालयाचा संक्षिप्त वार्षिक अहवाल वरीलप्रमाणे देत आहोत.

**IQAC**

Internal Quality Assurance Cell (अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष) हा महाविद्यालयाच्या शैक्षणिक व शिक्षणपूरक प्रगतीसाठी कार्यरत महत्त्वाचा विभाग असतो. त्या अंतर्गत विद्यार्थी प्राध्यापक व इतर कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. या विभागाचे समन्वयक म्हणून डॉ. एम.बी.पाटील हे कार्यरत आहेत. या विभागामार्फत 2017-18 या शैक्षणिक वर्षात खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

1. महाविद्यालयातील नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी Welcome fresher's कार्यक्रमाचे आयोजन.
2. विद्यार्थ्यांसाठी Reserch Project Writing व प्राध्यापकांसाठी 'Recent Amendments in API under CAS' या कार्यशाळेचे 29 सप्टेंबर 2017 रोजी आयोजन.
3. NAAC व रोटरी क्लब सोनपेठ यांच्या संयुक्त विद्यमाने GST वरील कार्यशाळेचे आयोजन.
4. महाविद्यालयाअंतर्गत 23 जानेवारी 2018 रोजी Changes in API frame work 4th Amendment विषयावर कार्यशाळेचे आयोजन.
5. IQAC व QTT Pvt.Ltd, Pune यांच्या संयुक्त व्यक्तिमत्त्व विकास यावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन.
6. बौद्धिक संपदा अधिकार ओळख, प्रक्रिया व संधी या विषयावर पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा येथे राज्यस्तरीय कार्यशाळेचे 28 एप्रिल 2018 रोजी आयोजन.

**वार्षिक अहवाल समिती समन्वयक**
**प्रा. सखाराम कदम**

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist.Parbhani
PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner